Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 767 – 771
DOI: 10.5281/zenodo.10279670

Original Research Article

# महात्मा गांधींच्या सत्याग्रहाचे तत्वज्ञान

प्रा. डॉ. घोलप के. जी.

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव ४१३५२८ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: gholapkamalakar@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधींच्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात सत्य व अहिंसा या तत्वास बहुमोल असे महत्व आहे. त्यांचे संपूर्ण राजकीय तत्वज्ञान याच तत्वावर आधारलेले आहे त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील चळवळीत जे सत्याग्रहाचे अस्त्र उदयास आले त्या अस्त्राची प्रेरणाही याच दोन तत्वामधून तयार झाली होती. म. गांधींचे सत्याग्रहाचे अहिंसात्मक तत्त्वज्ञान त्यांच्याच शब्दात समजून घेणे अधिक उचित ठरेल. गांधीजींनी आपल्या अनुयायांना अन्यायाशी व जुलमाशी अहिंसात्मक प्रतिकार करावयास शिकवले. पण ही अहिंसा भ्याड माणसाची नव्हती. जो निर्भय असतो, तो शूर असतो त्यासच ही अहिंसा आचरता येते. गांधीजी म्हणतात, "अहिंसा हा भ्याडाचा किंवा नेभळटपणाचा मार्ग नव्हे. मृत्यूला सामोरे जाणाऱ्या शूरांचा तो मार्ग आहे. हाती शस्त्रे घेऊन जो मृत्युमुखी पडतो, तो निसंशय शूर आहे. परंतु जरा देखील कच न खाता किंवा बोटे देखील न उचलता जो मृत्यूला सामोरा जातो, तो अधिक शूर म्हटला पाहिजे. तुम्ही नामर्दपणावर अहिंसेचे अस्तर चढविण्यापेक्षा, तुमच्या मनात जर काही खरोखरच हिंसा धगधगत असेल तर अहिंसेचे आचरण करणे अधिक चांगले असे मी बिनदिक्कत सांगेन. नामर्द पणापेक्षा हिंसा केव्हाही श्रेयसकर."[1]आणखीन पुढे जाऊन गांधीजी म्हणतात " माझा विचार हे अहिंसेवरिल अखेरचे भाष्य समजू नका. मला स्वतःच्या मर्यादांची जाणीव आहे. स्वतःचा शोध करणारा मी एक नम्रपाईक आहे. माझ्या प्रत्येक प्रयोगामुळे आयुष्य वरील माझी श्रद्धा अधिक द्रढमूल झाली आहे. अहिंसा ही मानव जातीला उपयुक्त अशी एक सर्वश्रेष्ठ शक्ती आहे. तिचा उपयोग व्यक्ती पुरताच मर्यादित नाही; तिचा प्रयोग समुदायाला देखील करता येईल अशी माझी दृढ श्रद्धा आहे."[2]

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. म. गांधीच्या तत्वज्ञानातून सत्याग्रह या शब्दाचा अभ्यास करणे.

२. म.गांधींच्या द्रष्टिकोणातून अन्याय करणारा व अन्याय सहन करणारा यांच्या वैचारिकतेचा अभ्यास करणे.

३. म.गांधी तत्वज्ञानातून सत्याग्रहाचा उद्देश म्हणजे काय ? याचा अभ्यास करणे.

४. म. गांधीजींच्या दृष्टिकोनातून सत्याग्रहातून प्रतिपक्षाचे मन परिवर्तन करणे या विचाराचा अभ्यास करणे.

५. म. गांधीजींच्या तत्वज्ञानातून आमरण उपोषण हा सत्याग्रहाचा अविभाज्य भाग आहे यावर प्रकाश टाकणे.

**ग्रहितके**

१. म. गांधीजींच्या सत्याग्रहात सहनशीलतेला महत्त्व असलेले दिसून येते.

२. म. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या तत्वज्ञानातून प्रतिस्पर्धी गटाची ताकत आजमावता येते.

३. म.गांधीजींच्या सत्याग्रहात क्रोधाला थारा नाही हे दिसून येते.

४. म.गांधीजींच्या सत्याग्रहात भयाची भावना कधीही जागृत झालेली दिसून येत नाही.

५. म.गांधीजींच्या सत्याग्रहाने नेहमी सत्याची कास धरलेली दिसून येते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधात विविध संदर्भ ग्रंथ, लिखित साहित्य, त्रैमासिके, मासिके, वर्तमानपत्र इत्यादी साहित्याचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**१. म. गांधीजींच्या तत्वज्ञानातून सत्याग्रह शब्दाचा अर्थ**

म. गांधींनी या शब्दाला समर्पक नाव सुचविण्याविषयी इंडियन ओपिनियन या नियतकालिकातून जाहीर आवाहन केले, तेव्हा अनेक नावे सुचविण्यात आली पण ती त्यांना पसंत नव्हती. त्याच वेळी "मगनलाल गांधींनी 'सदाग्रह' हे नाव सूचित केले."[3] महात्माजींनी त्यात किरकोळ फेरफार करून निःशस्त्र प्रतिकाराला चपखल असे 'सत्याग्रह' हे नाव निश्चित केले. सत्यामध्ये शांतीचा अंतर्भाव होतो. कोणत्याही गोष्टीचा आग्रह धरला म्हणजे बल प्राप्त होते. सत्याग्रह म्हणजे शांतिमार्गाने बलप्राप्तीचा उपाय, साधन किंवा मार्ग होय. महात्मा गांधींनी राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत अहिंसेचा आणि सत्याचा सिद्धांत हिरिरीने व निष्ठेने आणला. त्यांनी अहिंसक सत्याग्रहाला सामाजिक शक्तीचे रूप देऊन स्वातंत्र्य व स्वतःचे हक्क यांसाठी लढ्याचे एक प्रभावी हत्यार निर्माण केले. त्यांनी सत्याग्रहाला तात्त्विक भूमिकेचे अधिष्ठान दिले असून त्याचे संपूर्ण शास्त्र बनविले आहे. केवळ निःशस्त्र प्रतिकार म्हणजे सत्याग्रह नव्हे. सत्याग्रह हे एक जीवन दर्शन आहे. ती एक मूलगामी व सर्वंकष निष्ठा आहे. मनुष्याची सत्प्रवृत्ती व समंजसपणा यांवरील विश्वास हा सत्याग्रहाचा मूलाधार आहे. शुद्ध साध्याकरिता शुद्ध साधनेच उपयुक्त ठरतात शुद्ध साध्याकरिता अशुद्ध साधने उपयोगात आणल्यास साध्यही अशुद्ध बनते आणि साध्य दूर जाते. म्हणून सत्याग्रह हेच शुद्ध साधन होय. सत्याग्रह म्हणजे

सत्याकरिता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे होय.ज्या व्यक्तींच्या ठिकाणी नैतिक दृष्टया अयोग्य व गर्ह्य परिस्थितीचा प्रतिकार करण्याची शक्ती असते, तेच सत्याग्रहाचे खरे अधिकारी होत. त्यांची शरीरक्लेश सहन करण्याची शक्ती हा आत्मशक्तीचा एक भाग आहे. कित्येक वेळा शरीरक्लेश सहन करून प्रतिकार करणारा प्रतिपक्षावर जबरदस्तीही करू शकतो. त्याचा आग्रह अविवेकी असू शकतो. त्याची सत्याची कल्पना चुकीचीही असू शकते. त्यात असत्यही भरलेले असण्याची शक्यता असते. म्हणून खऱ्या सत्याग्रहीला नैतिक दृष्टया योग्य काय व अयोग्य काय, हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पतकरावी लागते आणि आपल्या प्रतिकाराच्या उद्देशात असत्य दिसल्यास माघार घेण्याची तयारीही असावी लागते. माघार घेण्यासाठी सुद्धा धैर्य लागते. निःशस्त्र प्रतिकारसुद्धा हिंसात्मक म्हणजे जबरदस्ती करणारा असतो. त्यात अत्या-चारही असतो. सत्य हे तत्त्वतः शत्रूलाही मान्य असावे लागते कारण विवेकबुद्धीची देणगी मानवाला प्राप्त झालेली आहे. शिवाय सत्याग्रहाला मर्यादा नाहीत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील गांधीजींच्या सामुदायिक सविनय कायदेभंगाच्या सत्याग्रहाच्या सामर्थ्यातून हे दिसून येते.

### २. न्याय अन्यायाचे परिक्षण

"अन्यायाविरुद्ध शांततेने आणि दृढ निश्चय याद्वारे प्रतिकार करण्याचा एक अभिनव अहिंसक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय"[4]. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह धरणे असाही होतो.सत्याग्रह यामध्ये प्रतिकारासाठी संयम व सहनशीलतेची अत्यंत आवश्यकता असते अन्याय करणाऱ्या व्यक्तीला सत्य व न्याय याची जाणीव करून देणे व त्या व्यक्तीचे मतपरिवर्तन करणे हे सत्याग्रहाचे उद्दिष्ट असते सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीने हिंसा व असत्य याचा वापर करता कामा नये सत्याग्रहाचा हा मार्ग सामान्य माणसालाही अनुसरता येतो.सत्याग्रह करणाऱ्याने अन्याय सहन न करता त्याचा अहिंसक मार्गाने प्रतिकार करणे आवश्यक असते.

### ३. म. गांधीजींच्या सत्याग्रहाचा उद्देश

"आत्मक्लेषाने मनात परिवर्तन घडवून आणणे हा सत्याग्रहाचा उद्देश असतो"[5]. अत्यंत कठोर हृदयाचा किंवा अत्यंत स्वार्थी प्रतिपक्षी असला तरी त्याच्या मनात परिवर्तन घडवून आणण्याच्या कामी जी जी संधी मिळेल ती स्वागतार्ह मानली पाहिजे.सत्याग्रही हा आपल्या मनात क्रोधाला थारा देणार नाही. प्रतिपक्षाचा राग तो सहन करीन प्रतिपक्षाकडून होणारे आघात तो सहन करील उलट आघात करणार नाही अशा प्रकारचे विचार ज्याने अवगत केलेले आहेत त्याच व्यक्तीला सत्याग्रह यशस्वीरित्या पूर्ण करता येतो. शरीरक्लेश सहन करण्याची शक्ती हा आत्मशक्तीचा एक भाग आहे. कित्येक वेळा शरीरक्लेश सहन करून प्रतिकार करणारा प्रतिपक्षावर जबरदस्तीही करू शकतो. आत्मक्लेषाचे हत्यार महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्यलढ्यात वापरून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. आणि जगाला दाखवून दिले की रक्ताचा एक थेंबही न सांडता शांततेच्या मार्गाने सुद्धा आपले ध्येय गाठता येते. हेच सत्याग्रहाचे महत्त्वाचे मूलतत्त्व आहे.

### ४. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहात भयाला स्थान नाही

म. गांधींनी आपल्या अनुयायांना अन्यायाशी व जुलमाशी अहिंसात्मक प्रतिकार करावयास शिकविले. पण ही अहिंसा भ्याड माणसाची नव्हती. जो निर्भय असतो, जो शूर असतो त्यालाच अहिंसा आचारता येते. महात्मा गांधीजी म्हणतात "अहिंसा हा भ्याडाचा किंवा नेबळटपणाचा मार्ग नव्हे. मृत्यूला सामोरे जाणाऱ्या सुरांचा तो मार्ग आहे. ज्यांच्या मनात भीती असते ते अहिंसेचा मार्ग कधीच स्वीकार करत नाही किंवा त्याला सत्याग्रहाचा मार्ग अवलंब करता येत नाही. म्हणून माझ्या सत्याग्रहात भयाला स्थान नाही हे मी ठामपणे सांगू शकतो "[6].

### ५. आमरण उपोषण

म.गांधीजींच्या सत्याग्रहाचे प्रमुख हत्यार हे आमरण उपोषण हे होते. कारण "आमरण उपवास हा सत्याग्रहाच्या कार्यक्रमाचा एक अविभाज्य भाग आहे आणि विशिष्ट परिस्थिती असताना तो सत्याग्रहाच्या भात्यातले अति महान व प्रभावी शस्त्र ठरते. मात्र योग्य अशा तालमीतून गेल्याखेरीज वाटेल त्याला त्याचा वापर करण्याची लायकी येत नाही"[7]. जगात महात्मा गांधीजींनी दिलेल्या या शस्त्राचा वापर आजही केला जातो. सरकारकडे आपले हक्क मागत असताना जर टाळाटाळ केली तर सरकारच्या विरोधामध्ये आपल्या हक्कासाठी आमरण उपोषणाला बसून आपले हक्क मिळवल्याचे अनेक दाखले इतिहासात आहेत. आजही या शस्त्राचा वापर करणे चालू आहे.

### निष्कर्ष

१. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहात संयम निर्धार ध्येय चिकाटी इत्यादी गुण मानवाला मिळतात .
२. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहाच्या तत्वज्ञानातून देशाला शांततेचा संदेश मिळाला.
३. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहाच्या तत्वज्ञानात आमरण उपोषण हा अविभाज्य घटक बनलेला दिसून येतो.
४. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहाच्या तत्वज्ञानातआत्मकलेश यावर भर दिलेला दिसून येतो.
५. महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानातज्ञानाने महात्मा गांधीजींनी सत्य आणि अहिंसा या मार्गाने जग जिंकता येते हा संदेश जगाला दिला.

### समारोप

म. गांधीजींच्या सत्याग्रही जीवनदृष्टीला ‘अध्यात्मनिष्ठ व्यक्तिवाद’ असे अत्यंत समर्पक नाव काही विव्दानांनी दिले आहे कारण या विचारप्रणालीत व्यक्तीची अंतःप्रेरणा, तिचे नैतिक सामर्थ्य, निर्माणक्षमता आणि व्यक्तीचे हृदयपरिवर्तन यांना विशेष प्राधान्य असते. गांधीजींची ही संकल्पना वैश्विक स्तरावर लोकप्रिय झाली असून सर्वमान्य झाली आहे. तिचे अनुकरण मार्टिन ल्यूथर किंग, केनेथ कौंडा वगैरे भारतेतर देशांतील नेत्यांनी केले आहे. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे साररूप त्यात आढळते.महात्मा गांधींनी अनुसरलेली सत्याग्रह ही एक वृत्ती आहे. तिचा उगम राग, लोभ, अनुराग, माया, प्रीती आदी कौटुंबिक भावनांत दिसतो. आपलेपणा, आदर, प्रेम, औदार्य हे कौटुंबिक जीवनाचे आधारस्तंभ असून प्रेम अथवा

माया यांचे साफल्य कृतींतून व्यक्त होते. ज्यांच्याविषयी आदराची व प्रेमाची भावना असते त्यांची सेवा करणे, त्यांच्यासाठी त्याग करून आत्मसमर्पण करणे, यातच प्रेमाची सफलता आहे. आदर्श कौटुंबिक जीवनात अनुस्यूत असलेली तत्त्वे मनुष्याच्या सर्व व्यवहारांत कृतीत आणणे, ही खरी सत्याग्रहाची जीवन प्रवृत्ती होय.

**संदर्भ ग्रंथ**


१. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, डॉ. जयसिंगराव पवार, निराली प्रकाशन पा. नं. 213.

२. कित्ता.

३. आधुनिक भारत, प्रा.एस.एस. भांडवलकर, अभिजित प्रकाशन लातूर, पा. न. 202.

४. आधुनिक भारत, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, पिंपळापुरे & कं.पब्लिशर्स, नागपूर पा. नं.70

५. भारतीय राजकीय विचारवंत, प्रा. बी. वाय. कुलकर्णी व प्रा. आशोक भा. नाईकवाडे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पा. नं. 110.

६. 20 व्या शतकातील महाराष्ट्र, य. दि. फडके, के. सागर प्रकाशन पा. न. 95.

७. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, डॉ. जयसिंगराव पवार, निराली प्रकाशन पा. नं. 214.